आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५ जुलै २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांविरोधातली शिक्षा आणि दंडाची रक्कम वाढवण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- गणपती उत्सवाकरता महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पाच हजार जादा गाड्या

- राष्ट्रीय एक जिल्हा एक उत्पादन पुरस्कार सोहळ्यात रत्नागिरी हापूस आंब्याला सुवर्णपदक, इतर विभागातही महाराष्ट्राला पदक

- भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्लांचं पृथ्वीवर आज पुनरागमन

**आणि**

- राज्याच्या विविध भागात पावसाचा जोर, अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प

**<><><><>**

मोठ्या परताव्याचं आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात शिक्षेची आणि दंडाची रक्कम वाढविण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात संबंधित आरोपी कंपनीची मालमत्ता शोधणं, त्यांचं मूल्यांकन करून खटल्याचा जलद निपटारा करण्यात पोलिसांना मदत करण्यासाठी राज्य सरकार विशेष व्यवस्था निर्माण करेल. यात आर्थिक क्षेत्रातल्या तज्ज्ञांसह मूल्यांकनासाठी खासगी कंपन्यांची मदत घेऊ असंही ते म्हणाले. यासंदर्भात अमोल खताळ यांनी मूळ प्रश्न उपस्थित केला होता. तर, प्रकाश सोळंकी आणि सुधीर मुनगंटीवार यांनी उपप्रश्न केले.

राज्याला बेघरमुक्त करण्याच्या दिशेनं प्रयत्न सुरू आहेत. राज्यातली प्रधानमंत्री आवास योजनेची प्रतीक्षा यादी संपली आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. यावर्षी केंद्र सरकारने देशात सर्वाधिक ३० लाख घरं महाराष्ट्राला मंजूर केली असून त्यातल्या २० लाख घरांसाठी निधी दिला आहे, असे ते म्हणाले. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना सौर प्रकल्प राबवण्यासाठी राज्य सरकार ५० हजार रुपये

आर्थिक मदत देत आहे. यामुळे त्यांचं वीज बिल शून्यावर यायला मदत होईल, असं त्यांनी सांगितले.

<><><>

अनधिकृत कत्तलखाने असताच कामा नये, अशी शासनाची भूमिका असून अशा कत्तलखान्यांवर तातडीनं कारवाई करायचे निर्देश पोलिसांना देऊ, असं आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत दिलं. आमदार विक्रांत पाटील यांनी मालेगाव महानगरपालिका क्षेत्रातल्या अवैध कत्तलखान्यांमधलं रक्तमिश्रित पाणी नदीसंगमात सोडलं जात असल्याबाबतची लक्षवेधी सभागृहात उपस्थित केली, त्याला ते उत्तर देत होते. नाशिक इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर गोदावरी नदीतही असं रक्तमिश्रित पाणी सोडलं जात असल्याचा मुद्दा पाटील यांनी अधोरेखित केला. अशा प्रकारची कोणतीही तक्रार प्राप्त झाली नसल्याचं सरकारने दिलेल्या उत्तरात म्हटलं आहे, मात्र याचे पुरावे असलेला pendrive आणि छायाचित्रं सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याचं पाटील म्हणाले. यावर मंत्री सामंत यांनी याची सखोल चौकशी करण्याचं आश्वासन दिलं. भविष्यात महानगरपालिकेच्या अधिकृत कत्तलखान्यातच कत्तल करायचा निर्णय घेण्यात आला असून तसे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.

<><><>

गणपती उत्सवाकरता कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सोयीसाठी यंदा राज्यपरिवहन महामंडळ पाच हजार जादा गाड्या सोडणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. गणपती उत्सवाच्या अनुषंगाने मंत्रालयात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते.

२३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान मुंबई, ठाणे, पालघर, या विभागांतल्या प्रमुख बसस्थानकातून ही सुविधा उपलब्ध राहील. या गाड्यांचं आरक्षण npublic.msrtcors.com या संकेतस्थळावर तसंच MSRTC Bus Reservation ॲपद्वारे, उपलब्ध होणार आहे. २२ जुलै पासून गट आरक्षणाला सुरुवात होईल.

<><><>

राष्ट्रीय ‘एक जिल्हा, एक उत्पादन’ 2024 पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रानं चमकदार कामगिरी करून अ श्रेणीत सुवर्ण पदक पटकावलं आहे. नवी दिल्ली इथल्या भारत मंडपममध्ये काल पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी रत्नागिरी, नागपूर, अमरावती, नाशिक आणि अकोला या जिल्ह्यांना कृषी आणि बिगर-कृषी क्षेत्रातल्या विशिष्ट उत्पादनांसाठी सुवर्ण, रौप्य, कांस्य आणि विशेष उल्लेखनीय पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

‘आंब्यांचा राजा’ म्हणून जगभर ओळखला जाणारा रत्नागिरी जिल्ह्याचा हापूस आंबा यंदाही अव्वल ठरला. कृषी क्षेत्रात अ श्रेणी अंतर्गत जिल्ह्यानं प्रथम स्थान मिळवलं. नागपूर जिल्ह्याच्या प्रसिद्ध संत्र्यांनी द्वितीय स्थान, तर अमरावती जिल्ह्यानं आपल्या मँडरीन संत्र्यांसाठी तृतीय स्थान मिळवलं.

विशेष उल्लेखनीय पुरस्कारांमध्ये कृषी क्षेत्रात अ श्रेणीमध्ये नाशिक जिल्ह्याला द्राक्ष आणि मनुकांसाठी, आणि बिगर कृषी क्षेत्रात ब श्रेणीमध्ये अकोला जिल्ह्याला कापूस जिनिंग आणि प्रेसिंगसाठी गौरवण्यात आलं.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता आणि वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद यांच्या उपस्थित पुरस्कारांचं वितरण झालं.

**<><><><>**

प्रधानमंत्री कुसुम योजनेला राजस्थान, गुजरात आणि मध्य प्रदेशात मिळालेल्या यशानंतर आता केंद्र सरकार लवकरच प्रधानमंत्री कुसुम योजनेचा दुसरा टप्पा सुरू करणार असल्याची घोषणा नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी केली आहे.

नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूकदारांनी सौर, पवन आणि जैव इंधनांपासून वीजनिर्मितीसाठी दिलेल्या पाठिंब्यामुळे हे शक्य झाल्याचंही जोशी यावेळी म्हणाले. भारताचं स्वच्छ ऊर्जा परिवर्तन हे केवळ पर्यावरणाच्या दृष्टीनं नाही तर ते एक राष्ट्रीय ध्येय आहे. नवीकरणीय ऊर्जा क्षमता वाढीमध्ये भारत आता जागतिक स्तरावर अव्वल तीन देशांमध्ये येतो. त्यामुळे २०३०पर्यंत आपल्या सरकारचं ५०० गिगावॅट जीवाश्मेतर इंधन क्षमतेचं लक्ष्य साध्य करण्यासाठी खासगी गुंतवणूक महत्त्वाची ठरेल, हेही जोशी यांनी यावेळी अधोरेखित केलं.

<><><><>

भारतीय अंतराळवीर ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला आणि त्यांचे सहकारी यांचं पृथ्वीवर पुनरागमन झालं आहे. कॅलिफोर्निया नजीकच्या समुद्रकिनाऱ्यालगत त्यांचं यान उतरलं. लखनौ इथं शुक्ला यांच्या घराजवळ त्यांच्या पुनरागमनाबद्दल जल्लोष साजरा करण्यात आला. परत आल्यानंतर हे अंतराळवीर पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी विलगीकरणात राहतील. शुक्ला यांनी आपल्या मुक्कामात भारताच्या दृष्टीनं महत्त्वाचे असणारे सात सूक्ष्म गुरुत्वाकर्षणविषयक प्रयोग केले आहेत.

<><><><>

ज्येष्ठ अभिनेते आणि निर्माते धीरज कुमार यांचं आज दीर्घ आजाराने मुंबई इथे निधन झालं. ते ७९ वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर कोकिलाबेन रुग्णालयात उपचार सुरू होते. आज त्यांची प्राणज्योत मालवली. समाज माध्यमांवर कुमार यांच्या निधनाचं वृत्त प्रसृत झाल्याचं हिंदुस्थान समाचारने दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

धीरज कुमार यांनी १९७० आणि १९८०च्या दशकात हिंदी चित्रपटसृष्टीत अनेकविध भूमिका केल्या. रोटी, कपडा और मकान, स्वामी, क्रांती, हिरा पन्ना अशा अनेक कलाकारांसोबत ते झळकले होते. हिंदीखेरीज त्यांनी पंजाबी चित्रपटांमध्येही अभिनय केला आहे. दूरदर्शनवरच्या ओम नमः शिवाय, श्री गणेश, जय संतोषी मां आणि जप तप व्रत अशा मालिकांची निर्मितीही धीरज कुमार यांनी केली आहे.

<><><><>

राज्याच्या विविध भागात आज सकाळपासून पावसानं जोर धरला असून अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबई आणि उपनगरात आज सकाळपासून दमदार पावसानं हजेरी लावली.

रत्नागिरीच्या खेड तालुक्यात मुंबई-गोवा महामार्गावर कालपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कशेडी घाटात दरड कोसळून वाहतूक कोंडी झाली असून, सध्या वाहतूक एकेरी मार्गावरून सुरू आहे. तसंच दरड हटवण्याचं काम युद्धपातळीवर सुरू आहे. रत्नागिरी तालुक्यात गेल्या २४ तासांत १४३ पूर्णांक ११ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. जगबुडी, शास्त्री आणि कोदवली या तिन्ही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली

आहे. मुसळधार पावसामुळे देवरूख संगमेश्वरमध्ये ठिकठिकाणी पाणी शिरल्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे.

रायगड जिल्ह्यातल्या माणगाव, तळा, रोहा, पाली, महाड, पोलादपूर या तालुक्यांमध्ये रात्रीपासून जोरदार पाऊस सुरू असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व माध्यमांच्या शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली असून हवामान विभागाने रेड अलर्ट दिला आहे.

सातारा जिल्ह्यातल्या कोयना धरणाचे सहा वक्री दरवाजे आज सकाळी ११ वाजता १ फूट ६ इंच उघडून ३ हजार ४०० क्युसेक विसर्ग कोयना नदीपात्रात सोडण्यात आला धरण पायथा विद्युतगृहातुन २ हजार १०० क्युसेक्स विसर्ग सुरू आहे.

मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे आणि सातारा जिल्ह्याच्या घाटमाथा परिसरात आज मुसळधार पावसाची शक्यता असून हवामान विभागानं या ठिकाणी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><>//**